International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील स्वातंत्र्य सेनानी अनंत केरुजी भोसले यांचे योगदान

**प्रा. जालिंदर पांडुरंग वाघ**
*दहिवडी कॉलेज, दहिवडी*
***Corresponding Author - प्रा. जालिंदर पांडुरंग वाघ***
**DOI - 10.5281/zenodo.18709943**

**प्रस्तावना :**

भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही केवळ राष्ट्रीय नेत्यांचा इतिहास नसून, तो असंख्य अज्ञात व स्थानिक स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागावर उभा आहे. महाराष्ट्रातील पंढरपूरसारख्या धार्मिक व सांस्कृतिक नगरीतूनही अनेक देशभक्तांनी स्वातंत्र्यलढ्यात सक्रीय भाग घेतला चळवळीमध्ये सोलापूर जिल्ह्याचे अनन्यसाधारण महत्व आहे. आपल्या त्यागाने, बलिदानाने अनेक स्वातंत्र विरांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत आहुती दिलेली आहे. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुका चळवळीच्या दृष्टिने महत्वाचा मानला गेला. पंढरपूर हे प्राचीन काळापासून विठ्ठल भक्तीमुळे जरी प्रसिध्द असले तरी स्वातंत्र्य चळवळीच्या काळात या तालुक्यातील विविध धर्मातील स्वातंत्र्यविरांनी सहभाग घेतलेला आहे. टिळकांच्य पंढरपूर भेटीने येथिल तरूण प्रेरित झाले होते. त्या चळवळीत "अनंत केरुजी भोसले" नावाचे तरूणही होते हे महत्वाचे आहे. सोलपूरातील मार्शल 'लॉ चे पडसाद पंढरपूर तालुक्यात देखील पहावयाला मिळते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत पंढरपूर तालुक्यातील अनेक स्वातंत्र्य विरांना वलिदान, कारावास, आर्थिक दंडाची शिक्षा भोगवयास लागली आहे. या शोधनिबंधात अनंत केरुजी भोसले यांच्या तुरुंगवासातील अनुभवांचा अभ्यास करण्यात आला आहे. म्हणुनच अशा दुर्लक्षीत स्वातंत्र्य सैनिकांच्या अथवा स्वातंत्र्य विरांच्या कार्यावर प्रकाश टाकणे गरजेचे वाटते.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. अंनत केरुजी भोसले यांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगादांचा अभ्यास करणे.
२. विजापूर, येरवडा व विसापूर तुरुंगातील अनुभवाचे विश्लेषण करणे.
३. तुरुंगवासाने त्यांच्या वैचारिक जडणघडणीवर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.
४. स्थानिक स्वातंत्र्यसैनिकांच्या इतिहासाचे दस्तऐवजीकरण करणे.

**जन्म व कार्य :**

अनंतचा भोसले यांचा जन्म पंढरपूर येथील नवरंगे बालकाश्रामात केरुजी भोसले व रमाबाई भोसले यांच्या पोटी आनंदी वातावरणात झाला. अनाथ बालकाश्रमातील अण्णासाहेब भोसल्यांच्या नोकरीमुळे त्या काळातील या कुटुंबाचे दिवस सुखासमाधानात, आनंदात जात होते. अनंतच्या आधीच्या तीन बहिणी. सुशीला, शांता व उषा प्रत्येकीच्या वयात साधारणतः दोन वर्षांचे अंतर असावे. या तिघींच्या पाठीवर मुलगा झाल्यामुळे सर्वांनाच अतिशय आनंद झाला. पुढे त्याचे नाव 'अनंत' म्हणून ठेवण्यात आले. पण ते केवळ कागदोपत्रीच राहिले. घरच्या लोकांनी लाडाने 'छोटू' नाव ठेवले. पुढे १९१८ मध्ये अनंत भोसले ची आई रमाबाई आजारपणामुळे व १९२० मध्ये वडील

केरुजी भोसले -हदय विकाराच्या झटक्याने मृत्य झाला. लहानपणीच अनंत भोसले व त्यांच्या भावंडाच्या डोक्यावरचे छात्र हरपले. भोसले भावंडाचा सांभाळ श्री नानासाहेब राणे यांनी केला. बाबुराव मोरेंनी अनंत भोसल्यांना झेन्डूजीबुवाच्या मठात शाळेत घातले व रितसर त्यांची त्यांची शाळा सुरु झाली. पुढे अनंत भोसलेंनी पंढरपूर मधील मराठा बोर्डिंग मध्ये प्रवेश घेतला की, जी त्यांच्यां वडिलांनी केरुजी भोसल्यांनी स्थापन केली होती. पुढे ते व्ही. जे. हायस्कूल या इंग्रजी शाळेत जाऊ लागले व याच हायस्कूलमध्ये शिकत असतांना भारतच्या स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्याचे दडे गिरवले.

१९३० च्या सुमारास महात्मा गांधीजी सत्याग्रह चळवळ सुरू झाली. गावात प्रभात फेऱ्या निघायच्या. या प्रभात फेऱ्यांमधून विद्यार्थी व जनता निरनिराळी राष्ट्रीय गाणी म्हणत असे. पंढरपुरात या वेळी 'लंगडे बापट' नावाचे काँग्रेस कार्यकर्ते होऊन गेले. ते एका पायाने लंगडे होते. हातात जाड काठी घेऊनच त्यांना चालता येत असे. शुभ्र खादीचे कपडे त्यांच्या अंगावर घातलेले असत. प्रसन्न चेहऱ्याने ते काम करीत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये ते लोकप्रिय झाले होते. पंढरपुरातील प्रभातफेऱ्यांमधून नरसोपंत परांडकर, नानासाहेब सांगोलकर, शंकरराव खडकीकर, पांडुरंग बाळू भिसे, बाबूराव जोशी, बाबूराव यवनकर, गुरुनाथ कुलकर्णी असे अनेक कार्यकर्ते होते. या सर्वांमध्ये बाबूराव जोशी हे तरुण, सुखवस्तू घरातील पुढारी होते ते अनंत भोसल्यांना म्हणायचे प्रभातफेरीसाठी 'मला सकाळी लवकर उठवायला येत जा. पंढरपूरच्या हायस्कूलमध्ये अनंत भोसले शिकले. त्या हायस्कूलची इमारत चंद्रभागेच्या काठी आहे. तिच्याशेजारी नगरपालिकेची इमारत आहे. अनेक बंगाली क्रांतिकारक 'क्रांती चिरायु होवो' आणि 'ब्रिटीश साम्राज्यशाही नष्ट होवो' असे तांबड्या कपड्यावर लिहून हा झेंडा ब्रिटीश विरोधी चळवळीत लाल रंगाचा वापरीत होते. असे अनंत भोसल्यांनी वर्तमानपत्रात वाचले होते. अनंत भोसल्यांनी असाच एक झेंडा पंढरपूर नगरपालिकेच्या इमारतीवर राष्ट्रीय निशाण लावायचे त्यांनी ठरवले. या कामात अनंत भोसल्यांना त्र्यंबक लक्ष्मण कदम व गणपती ईश्वरा सावजी या दोघांच्या मदतीने राष्ट्रीय झेंडा लावला.

भारतामध्ये गांधीजींची चळवळ सुरू झाल्यावर तिचे परिणाम पंढरपूरवर व हायस्कूलच्या तरुण विद्यार्थ्यांच्यावर झाल्याशिवाय कसे राहतील? भगतसिंह राजगुरू यांना सरकारने फाशीची शिक्षा दिली. हा दिवस २३ मार्च होता. या दिवशी भारतात सर्व ठिकाणी हरताळ पाळला. दुकाने, शाळा, कॉलेजेस बंद होती. पण भाई भोसल्यांच्या हायस्कूलमध्ये मात्र विद्यार्थी आल्यानंतर त्यांचे हेडमास्तर धडपळे यांनी मुलांना आपापल्या वर्गात बसवून बाहेरून क्लासला कड्या लावून घेतल्या. निर्धास्तपणे आपल्या ऑफिसमध्ये जाऊन बसले. अनंत भोसल्यांचे सहकारी विद्यार्थी मित्र शाळेबाहेरच होते. चंद्रभागेच्या बाजूने शाळेच्या खिडक्या होत्या. तिथे मुलांची शिडी करून खिडकीतून एक एक मुलगा बाहेर काढला आणि २०० मुलांची 'भगतसिंह जिंदाबाद' म्हणून मिरवणूक काढली. तेव्हा विद्यार्थ्यांच्या मिरवणुकीचा आवाज ऐकून धडफळे मास्तर बाहेर आले. अनंत भोसल्यांना त्यांनी छडीचा चोप भर रस्त्यावर दिला.

१९३१ सोलापूरमध्ये खूप जोरदार सभा, मिरवणुका चालू होत्या. लोकांचा जोर एवढा वाढला की शेवटी सरकारला चळवळ दडपण्यासाठी लष्कर आणावे लागले. मलप्पा धनशेट्टी, शिंदे, सारडा आणि कुर्बान हुसेन या चौघांना पकडून फाशी दिली. हा दिवस १२ जानेवारी १९३१ होता. ब्रिटीश सरकारचा निषेध म्हणून भारतभर हा दिवस 'हुतात्मा दिन' म्हणून साजरा करण्यात येत असे.

पंढरपुरात ही १९३२ साली १२ जानेवारी रोजी 'हुतात्मा दिन' साजरा करण्याचे पुढाऱ्यांनी जाहीर केले. बाबूराव जोशी यांच्या जाहीर सभेत एक व्याख्यान झाले. या व्याख्यानात त्यांनी, 'पंढरपुरातील वाटेल तेवढे लोक पकडले तरी १२ जानेवारी हा दिवस आम्ही साजरा केल्याशिवाय राहणार नाही,' असे सरकारला आव्हान दिले. सरकारने हे आव्हान स्वीकारले धरपकडीला जोरदार सरूवात केली. सरकारने बरेच पुढारी पकडले. यामुळे हा दिवस साजरा करण्याची जबाबदारी अनंत भोसले व विद्यार्थ्यांनी स्वीकारली. गावात गुप्त पत्रके त्यांनी वाटली. १२ जानेवारी संध्याकाळी चंद्रभागेच्या वाळवंटात जाहीर सभा होईल असे पत्रकात लिहिले होते. पोलिस अनंत भोसल्यांना पकडण्यासाठी गावभर अनेक घरांच्या झडत्या घेत होते. छापे घालत होते. पण त्यांना अनंत भोसले सापडले नाही. १२ जानेवारीला अनंत भोसले दुपारी ४ वाजता ज्या घरात लपून बसले होते त्यांच्याघरातून बाहेर पडले. पोलिसांना चुकवत चुकवत संध्याकाळी ६ च्या सुमारास चंद्रभागेच्या वाळवंटात जिथे सभा होती तिथे दाखल झाले. त्यांचा मित्र 'राम भादुले' हा सभेचा अध्यक्ष झाला होता. सभेच्या शेजारीच परदेशी कापडाची होळी पेटवली होती. 'बंडोपंत खडकीकर' हे सभेत बोलत होते. त्यांचे भाषण संपल्यावर अनंत भोसले बोलायला उभा राहिले. सभेला पोलिस बंदोबस्त कडक होता. भोसले बोलायलो उभे राहिल्याबरोबर 'नान्दे' नावाचे पोलीस सब इन्सपेक्टर यांनी अनंत भोसलेच्या छातीवर पिस्तुल रोखून 'एक शब्द बोलशील तर याद राख' असे बोलून त्या सभेवर लाठी हल्ला करण्याची पोलिसांना आज्ञा दिली. या सभेतच त्यांनी राम भादुले, बंडोपंत खडकीकर, गुरूनाथ कुलकर्णी, गोविंद लिमये, मारवाडी आणि अनंत भोसले या सर्वांना घेऊन पोलिस वाळवंटातून गावात जाण्यासाठी निघाले. लोक या प्रकाराने खूप खवळले होते. त्यांनी पोलिसांच्यावर दगडाने मारा सुरू केला. त्यातला एक दगड भोसल्यांच्या कपाळावर बसला. त्यातून रक्त वाहू लागले. रात्री भोसले व त्यांच्या मित्रांना मामलेदार कचेरीजवळ असलेल्या पोलिस लॉकअपमध्ये ठेवले.

**शिक्षा आणि कारावास :**

भोसले व त्यांच्या मित्रांना मॅजिस्ट्रेटच्या समोर उभे करण्यात आले. बेकायदेशीररीत्या सभा घेण्याचा त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला. गुन्हा नाकबूल करण्याचा प्रश्नच नव्हता. सर्वांनी गुन्हा कबूल केला. शिक्षा ठोठावण्यापूर्वी मॅजिस्ट्रेट भोसलेंना म्हणाले की, 'अजूनही तू माफी मागत असल्यास मी तुला सोडून देण्यास तयार आहे.' अनंत भोसलेंनी या गोष्टीस साफ नकार दिला. अनंत भोसले व त्यांच्या मित्रांच्या जबाबानंतर मॅजिस्ट्रेटनी १५ महिने सक्तमजुरी, १०० रुपये दंड आणि तो न दिल्यास आणखी ३ महिने सक्तमजुरी अशा शिक्षा ठोठावली.

**विजापूर तुरुंग :**

लगेच त्यांना लॉकअपमधून सोलापूर सबजेल मध्ये हलविण्यात आले. पंधरा दिवस सोलापूर इथे ठेवले. नंतर त्यांची रवानगी विजापूर जेलमध्ये करण्यात आली. हा जेल दोन हजार कैद्यांना ठेवण्याचा होता. तेथे शिस्त अतिशय कडक होती. संडासाला गेले तर बाहेर वॉर्डर दंड्या घेऊन उभा असे. पाच मिनिटे झाली की तो आपल्या दंड्या संडासाच्या पायऱ्यावर वाजवू लागायचा. त्यामुळे धड संडासात फार वेळ बसता येत नसे. बाहेरून आलेल्या कैद्यांना प्रथम १० दिवस वेगळे ठेवले जायचे. त्याला क्वारन टाईम असे नाव आहे. या तुरुंगावर 'चिपळुणकर' नावाच्या माणसाची नेमणूक झाली होती. गइबूसिंग नावाचा अतिशय क्रूर माणूस डेप्यूटी जेलर म्हणून काम करीत होता. त्याला सगळे कैदी भिऊन असत. सक्त मजुरीचे काम म्हणून अनंत

भोसलेंना दोन महिने चक्की दळण्याची शिक्षा दिली. या चक्कीवर तिघांनी उभे राहून आपल्या वाट्याला आलेले दळण दळायचे. असे दोन महिने काढल्या नंतर अनंत भोसलेंना 'पंजाकारपेट' चे म्हणजे जाजम विणण्याचे काम दिले होते. तुरुंगाच्या बाहेर भारतात सगळीकडे चळवळ चालूच होती. आणखीन लोक पकडून आणले जात होते. या पकडून आणलेल्या लोकात बॅरिस्टर नरीमन, कन्हैयालाल मुन्सी, गुलाबचंद, हिराचंद, सोलापूरचे श्री. भाऊसाहेब खडकीकर, डॉ. अंत्रोळीकर, भाई छन्नूसिंह चंदेले. कॉ. विभुते वगैरे प्रसिध्द कार्यकर्ते होते. यातच लक्षात रहाण्यासारखी गोष्ट म्हणजे सोलापूर जिल्ह्यातील निमगावचा मराठे नावाचा तरुण या तुरुंगात होता. तो राजकीय पुढारी नव्हता. निमगावला त्याच्या घरावर दरोडा पडला. तेव्हा रायफल हातात घेऊन त्यांनी चार दरोडेखोरांचे मुडदे पाडले होते. या चार दरोडेखोरांपैकी तीन दरोडेखोरांच्या छातीतून गोळ्या गेल्या होत्या. एका दरोडेखोरांच्या पाठीतून गोळी गेली होती. तेव्हा न्यायाधीशसाहेबांनी तीन दरोडेखोर चालून आले म्हणून स्वतःच्या रक्षणासाठी या लोकांना त्यांनी मारले असल्याने तो निर्दोष ठरवला गेला. पण चौथा दरोडेखोराच्या पाठीतून गोळी गेली असल्याने तो पळत असताना त्याच्या वर गोळी झाडून त्याला ठार केले आहे. असा आरोप ठेऊन त्याला जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आली होती. अशी शिक्षा झालेल्या कैद्यांना वार्डरचा हुद्दा देण्यात येतो. त्याचे कपडे म्हणजे पांढरी लांब पैंट, बुशर्ट आणि पट्टा, डोक्यावर पिवळी पागडी आणि हातात एक दंडुका, सगळ्या कैद्यांकडून काम करून घेण्याची जबाबदारी त्यांच्यावर असे. सगळ्या कैद्यांना ज्वारीची भाकरी दिली जायची तर या वार्डर्सना गव्हाची पोळी मिळत असे.

**येरवडा तुरुंग :**

चळवळीचा जोर वाढत असल्याने विजापूरच्या तुरुंगात खूपच गर्दी झाली होती. अनंत भोसलेंना व त्यांच्या साथीदारांना तिथून येरवडाच्या तुरुंगात पाठविण्यात आले. येरवडा तुरुंगात दोन हजार कैदी राहू शकतात. आणखीन कैदी येऊ लागल्याने सरकारला येरवाड्याच्या जुन्या तुरुंगाशेजारीच काटेरी तारेचे कुंपण असलेल्या जेलची उभारणी करावी लागली. सुमारे १८०० कैदी या नवीन तुरुंगात ठेवण्यात आले. तुरुंगाचे स्वरूप गोल असून त्यात सोळा बराकी बांधण्यात आल्या होत्या. या बराकींपैकी 'बराक नंबर बारा' मध्ये अनंत भोसलेंना ठेवण्यात आले. 'मे' महिन्याचे ते दिवस होते. त्या बराकीत महाराष्ट्रातील अनेक विद्वान माणसांना ठेवण्यात आले होते. नगरचे 'अच्युतराव पटवर्धन' त्यांचे बंधू रावसाहेब पटवर्धन, एस. एम. जोशी, आचार्य भागवत, विनायकराव भुस्कुटे, दादासाहेब साखळकर, हरा महाजनी, नाथ घाणेकर, डॉ. आठल्ये राघूअण्णा लिमये, यशवंतराव चव्हाण वगैरे मंडळी होती.

एका बराकीत १०० लोक ठेवले जात. मध्ये तीन तीन फुटाचे अंतर असे प्रत्येक कैद्याला एक काथ्याचे अंथरुण, दोन रंग, एक हाफ शर्ट, हाफ पैंट, लोकरीची बंडी, पांढरी टोपी, ताट आणि पाणी पिण्यासाठी टंबरेल एवढ्या वस्तू दिल्या जायच्या साबण, टूथपावडर, चप्पल वगैरे वस्तू स्वतःच्या खर्चाने आणण्याची परवानगी असायची. एस.एम. जोशी यांच्या पुढारीपणाखाली ५० लोकांची फाईल बनविण्यात आली. 'मे' महिन्यातल्या रणरणत्या उन्हात एका ठिकाणचे दगड डोक्यावर घेऊन दुसऱ्या जागी एक मैल अंतरावर टाकायचे. असे हे सक्त मजुरीचे काम अनंत भोसलेंना करावे लागले. साहजिकच एस. एम. जोशींच्या फाईलमधील सर्व लोकांची ओळख चांगलीच झाली होती. खूप लोक तुरुंगात आल्याने सर्वांना सक्तमजुरीचे काम देणे अवघड जाऊ लागले. जेल सुपरिटेंडेंट इन्सपेक्शनसाठी

आले की बराकीतील लोकांनी त्यांच्या समोर ओळीने उभे रहायचे. आणि तो जाईपर्यंत आपले ओठ पकडून दात बाहेर दिसतील अशा पध्दतीने उभे रहायचे. हे चार दिवस सगळ्यांनी केले. सुपरिंटेंडेंटकडे याबाबतीत तक्रार केली, 'स्वातंत्र्य सैनिक राजबंदी असून त्यांना स्वच्छतेचे महत्त्व चांगले कळते. केवळ कायदा आहे. म्हणून अशा अपमानस्पद रीतीने वागविण्यात येऊ नये अशी तक्रार केली होती.' जेलचे कायदे यामुळे हळूहळू सैल होऊ लागले. या बराकीतील भिंती शेणाने दर आठवड्याला सारवल्या जायच्या. त्यासाठी एका शेण फाईलची निवड करण्यात आली होती. खूप लांब भटकायला मिळते म्हणून अनंत भोसले, यशवंतराव चव्हाण, दयार्णव कोपर्डेकर या फाइलीत सामील झाले. एक लोखंडी पाटी त्यांच्या प्रत्येका जवळ असायची. शेण मिळविण्यासाठी तुरुंगापासून दूर दोन अडीच मैल त्यांची भटकंती व्हायची. अशी भटकंती चालू असताना ते खडकीच्या बाजूला गेले. मिलिटरीसाठी बांधलेला एक छान तलाव त्यांना तेथे दिसला. त्यांनी त्यांच्या जवळ असणाऱ्या लोखंडी पाट्या फेकून देऊन कपड्यासह त्या तलावात उड्या मारल्या. भरपूर पोहून झाल्यावर ते वर आले. त्यांच्या बंदोबस्तासाठी बरोबर असलेल्या शिपायाने सांगितले, 'आता तुम्हाला साहेबासमोर उभे करतो आणि शिक्षा करतो. जसजसा तुरुंग जवळ येऊ लागला तसतसे त्या शिपायाबरोबर गोड बोलून व लाडी-गोडी लावून साहेबाकडे शिक्षेसाठी न नेण्याची विनंती केली. त्यांनी ती मान्य केली.

दररोज दुपारी ४ वाजता त्यांच्या बराकीच्या बाहेर असलेल्या फाटकाला पोलिस कुलूप ठोकीत. नंतर आत असलेल्या १०० लोकांची आंघोळ, कपडे धुणे, असे व्यवहार चालत. पाच वाजता भाजी व भाकरी घेऊन पोहरे आणत असत. ओळीत बसून ते सार्वजन जेवण करीत असे. हातावर दोन भाकऱ्या, पाण्यासाठी टंबरेल उर्फ पॉट घ्यायचे. त्या पॉटवर एक खोलगट तव्यासारखी थाळी ठेवलेली असे. त्यात प्रत्येकाला १२ औंस भाजी दिली जायची. हातातील भाकरी आणि थाळीतील भाजी संपल्यानंतरच पाण्याच्या पॉटकडे लक्ष जायचे. जेवल्यानंतरच पाणी प्यायची सवय लागल्याने तुरुंगाबाहेरही चांगली सवय त्यांना लागली. जेवण झाल्यावर हुतूतू, आट्या-पाट्या, खोखो असे खेळ चालत. सातारा जिल्ह्यातील तरुण मंडळीचा यात सहभाग असे, मसूरचे 'राघुअण्णा लिमये' हे फारच उत्साही तरुण होते. या तरुणांचा त्यांनी एक क्लब स्थापन केला. या क्लबला त्यांनी 'चला खेळया संघ' असे नाव दिले होते. मराठी माणसांमध्ये नाथ घाणेकर हे वयस्कर पुढारी होते. त्यांनी एकाला 'चलो खेळूया संघ' तर दुसऱ्याला 'चला लोळया संघ' असे नाव दिले. असे खेळीमेळीचे वातावरण होते. बराकीमध्ये जे विद्वान होते त्यांचे वेगवेगळे अभ्यासवर्ग चालत. एस.एम. जोशी हे इंग्रजी शिकवीत, पुण्याचे विद्वान पंडीत आचार्य भागवत यांची ज्ञानेश्वरीवर प्रवचने होत. हरा महाजनी हे संस्कृतचे पंडित होते. ते स्वातंत्र्य सैनिकांना शाकुंतल, मेघदूत ही नाटके समजाऊन सांगत. साताऱ्याचे डॉ. आठल्ये व पुण्याचे श्री. गोखले हे आरोग्यशास्त्राचा तास घेत असत. साताऱ्याचे एक शाहीर दादा साखळकर हे भगतसिंह, राजगुरु, सुखदेव यांचे पोवाडे म्हणून दाखवीत. रावसाहेब पटवर्धन हे फडके, खांडेकऱ्यांच्या सुंदर सुंदर कादंबऱ्या मोठ्यांदा वाचून दाखवीत. दर रविवारी सर्वांची मीटिंग होत असे. त्या मीटिंगमध्ये बराकीत राहताना काय काय अडचणी येतात यासंबंधी विचारविनिमय होत असे. या बराकीत आपल्याला प्रवेश मिळावा म्हणून स्वातंत्र्य सैनिकाची धडपड चालू असायची. या बराकीत येण्यासाठी शाकाहारी असाल तरच परवानगी देऊ असे बराकीचे प्रवक्ते सांगू लागले.

दर रविवारी जेवणाच्या वेळी ज्यांना पाहिजे त्यांना गूळ व मटन मिळे. बाकीच्या आपल्या बंधूंना मटण खाणे आवडणार नाही म्हणून आत्माराम पाटील, यशवंतराव

चव्हाण, अनंत भोसले असे मटण खाणारे होते तरी त्यांनी मटण खाल्ले नाही पण मटण न खाण्याची गोष्ट त्यांना मुळीच मान्य नव्हती. प्रवक्त्याने ही अट प्रवेशासाठी सुरू केल्याने अनंत भोसले व त्यांच्या मित्रांनी निषेध म्हणून दर रविवारी गुळाऐवजी मटण घेण्यास सुरुवात केली. आचार्य भागवत यांच्याशेजारी अनंत भोसलेंना रहाण्यासाठी जागा देण्यात आली होती. एकदा भोसलें आजारी पडले. त्यांना उलटी होते हे भागवतांच्या लक्षात आले. त्यांनी लगेच आपली भाजी खायची थाळी अनंत भोसलेंच्या तोंडासमोर धरली. उलटी झाल्यावर सरळ ती बाहेर नेऊन फेकून दिली. तीच थाळी घासून पुसून त्या थाळीवर येणारी भाजी घेतली. असं सख्खा नातेवाईक सुध्दा करणार नाही. इतकं प्रेम तुरुंगात असणारे लोक एकमेकांवर करीत असत. अडचणीच्या प्रसंगी झालेल्या मैत्री टिकून राहतात.

**विसापूर तुरुंग :**

गांधीजींची सत्याग्रहाची चळवळ अजून चालूच होती. सत्याग्रह करून तुरुंगात येणारे लोक सारखे वाढतच होते. म्हणून तुरुंगातल्या काही स्वातंत्र्य सैनिकांची बदली विसापूर जेलमध्ये करण्यात आली. या बदलीमुळे काही पथके त्यांच्या अगोदर गेली होती. त्यांचा मित्र 'राधुअण्णा लिमये' हा निरोप देण्यासाठी आला. तेव्हा अनंत भोसलेंना दुखाःवेगाने काहीच बोलता नाही. सद्गतीत होऊन राधुअण्णा म्हणाला, 'तुझा मुग्ध शोक मला कसा कळणार?' एवढे झाल्यावर त्यांनी एकमेकाचा निरोप घेतला. थोड्या दिवसांनी अनंत भोसलेंची बदली विसापूर येथे झाली. यापूर्वी येरवाड्याच्या तुरुंगात असताना अनंत भोसले व त्यंच्या साथीदारांनी भाजीसाठी सत्याग्रह केला होता. कारण ती चांगली नसायची. बऱ्याच वेळा या बद्दल तक्रारी करूनही काही उपयोग झाला नाही. म्हणून भाजीचे पोहरे फेकून देऊन सर्वांनी अन्न त्यागास सुरुवात केली. येरवाड्याच्या जुन्या दगडी तुरुंगात गांधीजींना ठेवण्यात आले होते. आपल्या अनुयायांनी उपवास करून भाजीचे पोहरे मोरीत फेकून दिल्याचे गांधीजींच्या कानावर गेले. यासंदर्भात गांधीजींनाभेटण्यासाठी शिष्टमंडळात इतरांच्या बरोबर एस. एम. जोशी यांचाही समावेश केलेला होता. शिष्टमंडळ गांधीर्जीना भेटले. गांधीजींनी विचारले 'भाजीचे पोहरे तुम्ही फेकून का दिले?' शिष्टमंडळातील लोक म्हणाले 'भाजी चांगली नसते !' गांधीजींनी परत सवाल केला "चांगली नसते म्हणजे त्यात आळया किडे असतात काय?" शिष्टमंडळाने 'नाही' असे सांगितले. 'तुम्ही ती भाजी खाल्ली पाहिजे' असा निर्णय गांधीजींनी दिला. शिष्टमंडळातील एस. एम. जोशी यांच्यासारखे तरुण चडफडतच परत आले. गांधीजींचा हा निर्णय बराकीमधील सर्व लोकांना सांगितला. अन्नत्याग सोडून परत जेवणे भाग होते. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे दुसऱ्या दिवसापासून भाजी चांगली येऊ लागली. भाजीत लागणारे तेल, मसाला याची चोरी मधल्यामध्ये होत असे. ते पोहरे बराकीकडे पाठवले जात. बराकीतील कैदी तेल, मसाला पोहऱ्यात घालून खाऊ लागले. त्यांच्या परस्पर जेल अधिकाऱ्यांना गांधीजींनी सांगितले असले पाहिजे. गांधीजींची कार्य करण्याची अशी पध्दती होती.

अनंत भोसले व त्यांच्या साथीदारांची विसापूरला रवानगी झाल्यानंतर विसापूर येथील तुरुंगाचे जीवन सुरू झाले. या तुरुंगात दोन हजार लोक राहतील तेवढ्या बराकी या तुरुंगात होत्या. प्रत्येक बराकीत १०० लोक राहण्याची सोय होती. विसापूरच्या तुरुंगाला लागून एक मोठा तलाव होता. त्या तलावावरच सार्वजन आंघोळीला जात होते. क्विन्स नावाचा एक आयरिश तुरुंगाधिकारी होता. या तुरुंगात स. का. पाटील नावाचे मुंबईचे एक मोठे पुढारी होते. स. का. पाटील यांनी एक चिठ्ठी मुंबईच्या श्रीमंताला पाठवली की दोन हजार चप्पलांचे जोड तुरुंगात येऊन पडत असत. तीच गोष्ट साबण व टूथ पेस्ट यांची असे. पुढे पुढे तर

मुंबईचे श्रीमंत लोक जिलेबी, लाडू अशी जेवणे पण देऊ लागले. ही सर्व कर्तबगारी स. का. पाटील यांची होती. त्यामुळे तुरुंगातील अधिकाऱ्याची व स. का. पाटील यांची मैत्री झाली. संध्याकाळी चार वाजता सर्वांना बराकीत ठेवले जात असे. पण हा नियम स. का. पाटील यांना लागू नव्हता. ते मोकळेच असायचे. तुरुंगाधिकारीच्या बंगल्यावर त्यांचा मुक्काम असायचा. तिथेच ते आपले जेवण पण घेऊ लागले.

ज्यांची तुरुंगाची मुदत संपायची त्यांना तुरुंगाबाहेर जातेवेळी निरोप देण्याचा समारंभ व्हायचा. त्या समारंभात जे पाठीमागे राहिलेत त्यांची भाषणे व्हायची. अनंत भोसलेंचा एक कर्नाटकातील कुंभी नावाचा मित्र हा निरोपाचे भाषण करू लागला. तुरुंगामध्ये कुभी अनंत भोसलेंना कन्नड भाषा शिकवी व भोसले त्याला मराठी शिकवायचे. असे चालले होते. अनंत भोसले कानडी भाषेत फारशी प्रगती करू शकले नाही. पण कुंभी मात्र बऱ्यापैकी मराठी भाषा शिकला. अनंत भोसलेंना निरोप देण्याच्या सभेत कुंभीनी मराठीत भाषण केले. तो आपल्या भाषणात म्हणाला की, 'भोसले माझे चांगले मित्र झाले मनमिळावू होते. त्यांचा स्वभाव खूपच चांगला आहे. ते आपल्यामधून बाहेर जात आहेत. बाहेर ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो', हे मराठी भाषण ऐकल्यावर अनंत भोसलेंनी कुंभी याला साष्टांग दंडवत घातला! दुसरे काय करणार? विसापूर तुरुंगातून भोसले १८ महिन्यांची शिक्षा पूर्ण करून तुरुंगाबाहेर आले. तिथून ते पंढरपूरला आले. जन्मभर देशाची सेवा करायची हाच त्यांचा निर्णय ठाम झाला.

**निष्कर्ष :**

अनंत केरुजी भोसले यांचे विजापूर, येरवडा व विसापूर तुरुंगातील अनुभव हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील त्याग, संघर्ष व धैर्याचे उदाहरण आहे. अशा स्थानिक स्वातंत्र्यसैनिकाचा इतिहास अभ्यासल्याशिवाय स्वातंत्र्य लढ्याचे संपूर्ण चित्र समजून घेता येणार नाही.त्यांच्या कार्यातून आजच्या पिढीला देशप्रेम, सामाजिक बांधिलकी व मुल्यानिष्ठ जीवनाची प्रेरणा मिळते.

**संदर्भ ग्रंथ :**

१. अनंत केरुजी भोसले (१९९१) "अनंत अमुचि ध्येयासक्ति" प्रकाशक सौ. शोभा जाधव पोछखानवाला रोड, वारली मुंबई – ४०००१८

२. प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर (२०११) "सोलापुरच्या स्वातंत्र्यलढ्यातील दीपस्तंभ" प्रकाशक पुरुषोत्तम कुलकर्णी अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर – ४१३००१

३. फडके य. दि. (१९९३) "२० व्या शतकातील - महाराष्ट्र राजकीय इतिहास (१९३० ते १९३९) खंड ४, श्री विद्या प्रकाशन, पुणे.